VOL- XII ISSUE- XII DECEMBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# भारतीय भाषा आणि साहित्यातील योगदान

**सिदराया चतुर लोणी**
(संशोधक विदयार्थी)
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

**प्रस्तावना :**

माणूस हा असा आहे की त्याला आपल्या मुलभूत गरजा ह्या अन्न,वस्त्र,निवारा यावर आधारीत आहेत. या गरजा भागवण्यासाठीच तो आहोरात्र कष्ट करत असलेला आपणास दिसतो. आणि या सृजनशीलतेच्या सहाय्याने तो संस्कार आपल्या विचारधारेवर निर्माण करताना दिसतो. या संस्कारधारेतून निर्माण होणारे विचार,चालीरीती,पध्दती म्हणजेच माणसाची संस्कृती होय. प्रत्येक व्यक्तीची संस्कृती ही दुसऱ्या व्यक्तीच्या संस्कृतीकडून काही प्रमाणात का होईना वेगळी व स्वतंत्र असलेली आपणास दिसते.भाषा हे एक साहित्याला आगळीवेगळी ओळख निर्माण करून देणारे अविभाज्य भाग आहे. माणूस आपल्या विचाराचा आसणारा सार आपल्या भावनीकतेच्या आधारावर आपल्या पिडीजात असलेल्या माध्यमातून तो मांडत आलेला आहे. आपले आचार विचार जो तो आपल्या आपल्या स्वरूपात व्यक्त करतो मांडू शकतो.भारतीय भाषेमध्ये ज्यात्या प्रांतांनुसार व विचाराच्या आधारावर भाषा मांडली गेलेली दिसते.समाजबांधीलकीच्या व विचाराचा आसणारा पगडा हा वेगवेगळया साहित्यीकाच्या लेखनीतून व योगदानातून झालेला आपणास दिसतो.

**१.भाषा म्हणजे काय ?**

भाषेविषयीचे कुतूहल प्राचीन काळापासून माणसाला वाटत आले आहे. अगदी पूर्वीपासूनच लोकपरंपरेत भाषेच्या उगमाबद्दल,शक्तीबद्दल विविध आख्यायिका,कहाण्या प्रचलित आहेत. भाषा हे आपल्या अंतरंगातील मनोगत, भावना, विचार इ. प्रगट करण्याचे साधन आहे, ही जाणीव तर पूर्वीपासून आहेच. सर्वसाधारण व्यवहारात 'भाषा' ही संज्ञा वापरण्यात काही चुकीचे नसले तरी तीचा सखोल अभ्यास करायचा असेल तर मात्र आपण कशाचा नेमका अभ्यास करणार आहोत हे स्पष्ट असावे लागते. एकादृष्टीने केवळ 'बोलणे' म्हणजे भाषा नव्हे,तर भाषा ही गोष्ट त्यापलिकडची,अधिक व्यापक अशी आहे असे अभ्यासक मानतात. भाषा ही विविध प्रकारांनी मानवी जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून असलेली गोष्ट असल्याने तीच्याकडे पाहण्याचा विविध रीती आणि दृष्टीकोन संभवतात. साहजिकच तीच्या व्याख्याही निरनिराळया प्रकारे केल्या गेल्या आहेत.

१) "मानवी मुखयंत्रणेतून निर्माण झालेली ध्वनिचिन्हांनीयुक्त असलेली यादृच्छिक संकेतव्यवस्था म्हणजे भाषा होय."
२) "विचार व्यक्त करणारे साधन म्हणजे भाषा होय."
३) "व्यवहाराची आचुक माहिती ज्याच्याआधारे रीतसर मांडता येते किंवा व्यक्त करता येते ती भाषा होय."

एकंदरीत भाषा ही विचार व साहित्याला एक अभिलाषा मिळवून देणारे साध्य आहे. त्यात वैचारिक स्वरूपात असणारे आनुभव व त्याला आवश्यक असलेले तत्त्वज्ञान महत्त्वाचे ठरते.

**२.भारतीय भाषा :-**

जगातील सध्याची लोकसंख्या सुमारे ७.७ अब्ज आहे आणि ते सर्व ५००० हून अधिक भाषा बोलतात. २०१० ते २०१३ दरम्यान केलेल्या पीपल्स लिन्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया नुसार,आपल्या भारत देशाची लोकसंख्या १३० कोटी आहे आणि येथे ७८० हून अधिक भाषा बोलल्या जातात. १९६१ पासून दरवर्षी आपल्यातून गायब होणाऱ्या भाषांची संख्या १६५० आहे. जर हे असेच चालू राहिले तर पुढील १०० वर्षात ५०० भाषा गायब झाल्या तर आश्चर्य वाटणार नाही. भारतीय संविधानाने आठव्या अनुसूचीमध्ये २२ भांषाना 'अधिकृत भाषा'चा दर्जा दिला आहे. ज्यात आसामी, बंगाली, बोडो,डोगरी,गुजराती,कन्नड, हिंदी, का श्मिरी, कोकणी, मैथीली,मल्याळम,मणिपुरी,मराठी,नेपाळी,उडिया,पंजाबी,

संथाली, सिंधी,तामिळ,तेलगू आणि उर्दू. त्याच्या मुळांच्या आधारे भारतीय भाषांचे ४ वर्गीकरण करता येते.

१) इंडो-आर्यन भाषा कुटुंब
२) द्रविड भाषा कुटुंब
३) खगोल आशियाई भाषा कुटुंब
४) तिबेटो -बर्मन भाषा कुटुंब

या ४ कुटुंबांना समजून घेऊन आपण सगळयाच भारतीय भाषेबद्दल माहिती आपण मिळवू शकतो.

**३.मराठी भाषा :-**

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सह-अधिकृत भाषा आहे. २०११च्या जनगणनेनुसार,भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे १४ कोटी आहे.मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे.मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे अधूनिक रूप आहे.मराठीच्या बोलीभाषा या कोळी, आगरी,माणदेशी, वऱ्हाडी,तंजावर मराठी,कुणबी, महाराष्ट्रीय कोकणी इ.या आहेत. मराठी भाषेची लिपी ही देवनागरी म्हणून वापरली जाते.

भारतीय राज्यघटनेतील २२ अधिकृत भाषांच्या यादीत मराठीचा समावेश आहे. महाराष्ट्राची मायबोली मराठी असल्याने महाराष्ट्र दिनानिमित्त 'मराठी राजभाषा दिन' अर्थात 'मराठी भाषा दिन' १मे रोजी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक यांनी घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या सरकारने 'मराठी राजभाषा अधिनियम १९६४' सर्वप्रथम ११ जानेवारी १९६५ रोजी प्रसिध्द केला. या अधिनियमानुसार, महाराष्ट्रांची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे जाहीर करण्यात आले. त्यानंतर १९६६ पासून या निर्णयाची अंमलबजावणी सूरू झाली. मराठीला राजभाषेचा दर्जा देऊन जणू मराठीचे राज्याभिषेक करून आधूनिक महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक सरकारने मराठीचा ऐतिहासिक गौरव केला.

**४.साहित्य :-**

साहित्य म्हणजे लिखित,बोलल्या गेलेल्या कलाकृतींचा संदर्भ आहे.यात कविता,कथा, कादंबरी, नाटके,निबंध,विनोद,लघुनिबंध,प्रवासवर्णन,बालसाहित्य,समीक्षा, व्याकरणग्रंथ,चरित्रे-आत्मचरित्रे इ.अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो.त्याच बरोबर साहित्यक्षेत्राचा विचार करता त्यात लीळा,संत साहित्य,मराठी साहित्य,ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य,दलित साहित्य याचा समावेश होतो. साहित्य विश्वात मराठी साहित्याला सुध्दा एक अत्यंत तुलनिय व महत्त्वाचे असे स्थान आहे. साहित्यलेखनाची भाषा ही मराठी म्हणून त्यात वापरली जाते. सामाजिक,राजकीय,वैचारिक जाणिवाचा अविष्कार हा प्रत्येक साहित्यिकाने आपल्या आसणाऱ्या साहित्य प्रकाराच्या माध्यमातून मांडण्यचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठी बोलीचा आसणारा साज आपल्या बोलीच्या माध्यमातून त्यांनी लेखनीच्या द्वारे अभिव्यक्त केलेला दिसतो.साहित्य हे वेगवेगळया भावनाचा आसणारा असा सुरेख संगम आसलेला पहावयास मिळतो.साहित्यिकाने आपल्या आत्मिक व सामाजिक जाणीवाना एक नवउजाळा देण्याचे काम केले आहे.साहित्य ही विचारविलासतेची दुसरी शाखा असलेली आपणास दिसते. कुटलाही साहित्यिक मंग तो कुटल्याही भाषिक प्रकारातील असो तो आपल्या विचाराचा उजाळा आपल्या भाषिक विचारानवरतीच प्रखरपणाने मांडत असतो.

साहित्य ही विविध कलागुणाचा व कलाकृतीचा एक आगळावेगळा मिलाप मांडतो.मराठी साहित्यिकांनी जे भोगले जे सोसले त्याचा मिलाप ज्याच्यातून त्यांना घालता आला ते म्हणजे साहित्य होय. वस्तुत: व वास्त्व जीवनाचे अविष्कारीकपणा आपल्या साहित्यातून त्यांनी मांडलेला आहे. माणसाला माणूस म्हणून जगत असताना त्यांला ज्या उदारक अशा समस्याना सामोरे जावे लागले व त्या समस्याच्या निरासणासाठी त्याना जे व्यासपीठ मिळाले ते म्हणजे साहित्य होय. मराठी साहित्यविश्वाचा साहित्याच्याबाबतचा विस्तार पहाता लीळा हा साहित्याचा प्रकार महत्त्वचा ठरतो.त्यात श्रीचक्रधर स्वामीच्या विचाराचा भाषेचा चांगला पगडा दिसतो.चक्रधराच्या व त्याच्या शिष्यपरंपरंचा साहित्यात फार मोठावाटा असलेला दिसतो.

**५.साहित्याची भाषा:-**

आधुनिक भाषाविज्ञानाने 'बोलली जाते ती भाषा' हे तत्व अनुसरल्यामुळे भाषाभ्यासात आपोआपच भाषेच्या लिखित रूपाला दुय्यम स्थान येते. भाषा बोलली जाते बोलण्यासाठी भाषेचा वापर होणे,यावर तिचे अस्तित्व अवलंबून असते. कोणत्याही भाषेचे लिखित रूप ही एक

सोय असते. त्यामुळे भाषाभ्यासात या रूपाला दुय्यम समजले जाते. कारण बोलणे पकडून ठेवण्यासाठी,जतन करण्यासाठी लेखकाला अस्तित्वात आलेली आहे. मातृभाषेच्या बाबतीत तिचे लिखितरूप समजून घेण्याची प्रक्रिया ही भाषा बोलीरूपात उत्तम प्रकारे अवगत झाल्यानंतर सुरू होते. परंतू ही प्रक्रिया सर्व समाजाच्या बाबतीत घडते असे नाही. समाजातील जे लोक शाळेमध्ये प्रवेश घेतात त्यांच्याच वाट्याला भाषेच्या लिखित रूपाचे ज्ञान येते.नाही तरी भाषा घेऊनही खूप मोठा वर्ग अशिक्षित राहतो. बोलणे आणि लिहीणे या दोन्ही पध्दतीमध्ये मानव भाषा वापरून संप्रेषणाची क्रिया पुर्ण करतो.

भारतासारख्या लोकसंख्येने मोठया देशामध्ये तर खूप मोठा समाज भाषा केवळ बोलण्यासाठी वापरतो. मराठी समाजापूरता विचार केल्यास या आसणाऱ्या समाजामध्ये सुक्षितांचेप्रमाण अलीकडच्या काही वर्षामध्ये वाढलेले दिसते.त्यामुळेच या मराठी भाषेच्या मौखिक साहित्याच्या परंपरेचा मोठा अभिमानास्पद वारसा दिसतो. या संदर्भात उदाहरण म्हणून संतसाहित्याचा विचार करता येईल. संताचे सर्व साहित्य आज लिखित रूपात उपलब्ध आहे. तथापी ते जेव्हा असे लिखित रूपात उपलब्ध नव्हते तेव्हा ही ते तेवढ्याच मोठया प्रमाणात मौखिक परंपरेने श्रवण केले जात असे. लिखित भाषेचे दुय्यम स्थान भाषावैज्ञानिक दृष्टीने मान्य केले तरी भाषेच्या लिखीत रूपाचे फायदे आणि गुणधर्म दृष्टीआड करता येणार नाहीत.लिखित भाषासंदर्भात डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे निरीक्षण आवर्जुन घ्यावे असे आहे, ते म्हणतात "मेंदूला जाणवणारे संबोधन भाषिक प्रकियेत व्यक्त होताना लेखनप्रक्रिया बोलण्याच्या प्रक्रियापेक्षा अधिक अंतरिक,अर्थाच्या गाभ्याशी अधिक संलग्न राहून सुक्ष्मांतर शैलीरूपे प्रकट करीत राहते. त्यामुळे भाषण आणि लेखन यांच्यातला फरक केवळ बोलणे, लिहणे हया सामान्य क्रिया इतका वरवरचा राहत नाही. लेखनात संवेदनशिलता प्रकर्षाने उमटवण्याची खास शक्ती आहे. साहित्याला आवश्यक अशा आत्मसंवादी वृत्तीचे थेट लिपीकरण लेखन प्रक्रियेला अशा शक्तीमुळे सुकर होते स्वागतपरता हा लेखनप्रक्रियेचा पाया असतो.विशेषत: साहित्य ही कला आत्मनिष्ठ होऊ लागल्यापासून लिखित भाषेचे स्वत:चे तर्कशास्त्र साहित्याच्या परंपरेतून स्पष्ट होत आले आहे. साहित्याचे मौखिक आणि लिखित असे विभाजन केले तरी मौखिक साहित्याची भाषिक शैली अधिक संवेदनशील असते.लिहलेला, कोरलेला मजकूर सर्वांना उपलब्ध होऊ शकतो.तो अधिक टिकाऊ व मुळावर हुकूम असता."[१] लिखित भाषेचे हे गुणविशेष सांगताना नेमाडे हे सुचवितात की, लिखित भाषा म्हणजे केवळ बोलीचे दृश्य स्वरूप नव्हे तर तीच्यामध्ये त्यापेक्षा अधिक काही असते.

**६.भाषेचे साहित्यातील योगदान :-**

भाषा व साहित्य यांचा एकमेकाशी चांगलाच संबंध दिसतो. साहित्य हे भाषेच्या शिक्षणमध्ये एक वेगळीकतापुर्ण साहित्य म्हणून काम करते. भाषेचे योगदान हे वेगवेगळया प्रकारे सांगण्यात येते. साहित्य हे भाषेच्या शैक्षणात अस्सल साहित्य म्हणून काम करते.व साहित्यीकाची मजकूराची भाषा समृध्द, विस्तृत वाचनामध्ये योगदान मोलाचे देते. भाषा हे साहित्याची समग्री असल्यामुळे लेखनासपुरक अश्या वेगवेगळया छटानी ती वापरली जाते रंगवरली जाते.लिहणारा साहित्यीक हा कोणत्या पार्श्वभूमीतून आलेला आहे यावरती त्यांचे वेगळेपण आवलंबून असते.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. भालचंद्र नेमाडे, साहित्याची भाषा,सांकेत प्रकाशन,औरंगाबाद,पृष्ठ क्र.८ व ९.
२. डॉ.ना.गो.कालेलकर,भाषा आणि संस्कृती, फडके प्रकाशन,पुणे
३. आनंद यादव,मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,
४. गणेश देशपांडे, भारतीय साहित्यशास्त्र.